म.टा. ५-५-१९.

# फेरीवाल्यांना लगाम

## मिरा-भाईंदरमध्ये कारवाईसाठी पूर्ण वेळ विशेष पथक

- महापालिकेचा निर्णय; प्रभाग स्तरावर पथक
- मनुष्यबळासाठी कंत्राट प्रक्रिया अंतिम टप्प्यात

**भाविक पाटील**, मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदरमधील बहुतांश रस्ते फेरीवाल्यांनी व्यापले असले, तरी पालिकेकडील अपुऱ्या मनुष्यबळामुळे त्यांच्यावर नियमित कारवाई करण्यात अडथळे येतात. या पार्श्वभूमीवर फेरीवाले हटवण्यासाठी विशेष पथक पूर्ण वेळ कार्यरत ठेवण्याचा निर्णय पालिकेकडून घेण्यात आला आहे. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ पुरवण्याच्या कंत्राटाची प्रक्रियादेखील अंतिम टप्प्यात आहे. हे पथक कार्यरत झाल्यानंतर बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना लगाम बसेल, असा दावा प्रशासनाकडून केला जात आहे.



### अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करा

मिरा-भाईंदरमध्ये फेरीवाल्यांची संख्या वाढण्यास पालिका अधिकारी व स्थानिक राजकीय नेते जबाबदार असल्याचे सांगितले जाते. काही वेळा पालिकेचे कारवाई पथक घटनास्थळी पोहोचण्याआधीच फेरीवाले पळ काढतात. त्यामुळे पालिकेच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. या पार्श्वभूमीवर, एखाद्या परिसरात फेरीवाल्यांवर नियमित कारवाई होत नसल्यास संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जागरुक नागरिकांकडून केली जात आहे.

मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांसह रहदारीच्या सर्वच रस्त्यांवर व पदपथांवर बेकायदा फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहतूक कोंडी लक्षात घेता, पूर्वी अरुंद असलेले शहरातील रस्ते मधल्या काळात रुंद करण्यात आले आहेत. मात्र, या रस्त्यांवर फेरीवाले बसत असल्यामुळे कोंडीची परिस्थिती 'जैसे थे' आहे. वाहतूक कोंडीमुळे तसेच रस्त्याने चालतानाही नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. फेरीवाल्यांच्या संख्येत दिवसागणिक वाढ होत असल्याने ही समस्या गंभीर होत चालली आहे.

बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर पालिका प्रशासनाकडून कारवाई केली जाते. मात्र, बेकायदा बांधकामे व फेरीवाल्यांवर कारवाई करण्यासाठी उपलब्ध मनुष्यबळ अपुरे पडते. त्यामुळे फेरीवाल्यांना विरोधात नियमित कारवाई करणे शक्य होत नसल्याचे मत अधिकाऱ्यांनी मांडले होते. या पार्श्वभूमीवर, पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्या आदेशानुसार फेरीवाल्यांवर नियमित कारवाई करण्यासाठी प्रभाग स्तरावर विशेष पथक निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे पथक पूर्ण वेळ केवळ फेरीवाल्यांविरोधात कारवाईचे काम करणार आहे. या पथकासाठी आवश्यक मजूर व टेम्पो तसेच इतर साधने उपलब्ध करण्यासाठीची निविदा प्रक्रिया राबवली जात असून ही प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. प्रत्येक प्रभागाला आवश्यकतेप्रमाणे कारवाईसाठी मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाणार आहे. सहायक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली हे पथक कार्यरत असणार आहे. त्यामुळे बेकायदा व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना लगाम बसेल, अशी ग्वाही पालिका उपायुक्त मारुती गायकवाड यांनी दिली.

पुढारी पा.नं. ५.

# ६ जुगारी महिलांसह ८ जणांवर कारवाई

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

नयानगर पोलीस ठाणे हद्दीतील शांतीनगर येथील जैन मंदिराजवळ असलेल्या एका इमारतीत जुगार खेळणाऱ्या ८ जणांवर पोलिसांनी कारवाई केली आहे.

मिरारोड येथील सेक्टर नंबर ४, शांतीनगर येथील जैन मंदिराजवळ असलेल्या इमारतीत एका फ्लॅट मध्ये जुगार खेळत असल्याची माहिती गुन्हे शाखा कक्ष १ यांना मिळाली. त्यानुसार, त्या इमारतीमधील फ्लॅटमध्ये गुन्हे शाखेने पोलीस पथकासह छापा टाकला. त्यावेळी प्लॅटच्या हॉलमध्ये एक महिला बसली होती. तिच्याकडे चौकशी केली असता तिने बेडरूममध्ये जुगार खेळत असल्याचे सांगितले. त्या बेडरुमचा दरवाजा उघडला असता तेथे ६ महिला व २ पुरुष पत्ते खेळत असल्याचे दिसून आले. त्यावेळी चौकशी केली असता ते ३ पत्त्याचा जुगार खेळत असल्याचे सांगितले. तसेच समोर असलेली महिला ही जुगार खेळण्यासाठी प्रत्येक डावा मागे पैसे घेते, असे सांगितले. त्या महिला व पुरुष हे वेगवेगळ्या ठिकाणावरून जुगार खेळण्यासाठी तेथे आले होते. त्यांच्याकडे १९४१० रुपये रोख रक्कम मिळून आली.

CamScanner

म.टा. पा.नं.१२.

# सायबर गुन्ह्यांविरोधात 'ट्रूकॉलर'ची साथ

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

एखाद्या मोबाइल क्रमांकाची सत्यता पडताळणे आणि सायबर गैरप्रकारांपासून बचाव करण्यासाठी दिल्ली पोलिसांनी 'ट्रूकॉलर' या खासगी कंपनीची मदत घेतली आहे. मोबाइल यूजरची माहिती मिळविण्यासाठी दिल्ली पोलिस या कंपनीबरोबर करार करणार आहेत. महत्त्वाच्या पदांवरील व्यक्ती किंवा सरकारी अधिकारी असल्याचा बनाव रचून होणाऱ्या फसवणुकांना अटकाव करण्यासाठीही या करारातून फायदा होईल, असे मानले जाते.

सायबर गुन्हेगारी रोखण्याबरोबरच जनजागृती करण्यासाठीही दिल्ली पोलिसांचा प्रयत्न आहे. यासाठी 'ट्रूकॉलर'शी करार करण्यात येत असून, ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे दिल्ली पोलिसांकडून सांगण्यात आले.



**" करोना काळामध्ये ऑक्सिजन सिलिंडर-कॉन्सन्ट्रेटर यांची विक्री, औषधांचा पुरवठा यांसारख्या अनेक अफवांमागील सत्यता पडताळणे आणि गैरप्रकारांचा भांडाफोड करण्यामध्ये 'ट्रूकॉलर'ची मदत झाली आहे. दिल्ली पोलिसांनी माहिती दिल्यानंतर, 'ट्रूकॉलर'कडून या नंबरवर 'स्पॅम' अशी मोहोर उमटवली. त्यामुळे, नागरिक सावध झाले आणि गैरप्रकार मोठ्या प्रमाणात थांबले.**

– **सुमन नलवा,** पोलिस उपायुक्त (जनसंपर्क अधिकारी), दिल्ली

## नव्या यूजरना फायदा

- डिजिटल सुरक्षेसाठी दिल्ली पोलिसांच्या सहकार्याने मोहीम राबवणार असल्याचे 'ट्रूकॉलर'च्या जनसंपर्क संचालक प्रज्ञा मिश्रा यांनी सांगितले.
- संशयास्पद क्रमांक ओळखून, यूजरना त्याची सूचना देणाऱ्या यंत्रणेचा नागरिकांना फायदा होईल.
- महिला, ज्येष्ठ नागरिकांना या यंत्रणेचा फायदा होईल.

## पोलिसांना 'ग्रीन बॅच'

अनेक वेळा दिल्ली पोलिस असल्याचे सांगून आणि खोटे फोटो लावून फसवण्याचे प्रकार घडतात. खोट्या धमक्या देऊन खंडण्या उकळण्याचे प्रकार घडतात. त्यामुळे, अशा क्रमांकांना 'स्पॅम' दाखवतानाच, दिल्ली पोलिसांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या क्रमांकांना ग्रीन बॅच आणि निळ्या रंगाची टीक असले.

## जनजागृतीचा प्रयत्न

सायबर चोरीचा सर्वाधिक फटका हा सामान्य नागरिकांना बसतो. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृतीचे कार्यक्रम राबवतानाच, 'ट्रूकॉलर'कडून प्रशिक्षणाचे शिबिर राबवण्यात येईल. सुरक्षेच्या उपायांविषयीचे व्हिडीओ व्हायरल करण्यात येतील, असे 'ट्रूकॉलर'च्या जनसंपर्क संचालक प्रज्ञा मिश्रा यांनी सांगितले.

म.टा-५.पा-१.

# पालिका परिवहनच्या कर्मचाऱ्यांना मारहाण

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

## मिरा रोडमधील घटना

मिरा रोड रेल्वे स्थानक परिसरात वाहतुकीला अडथळा ठरणारे वाहन हलवण्याची विनंती करणाऱ्या पालिका परिवहनच्या कर्मचाऱ्यांना मारहाण करण्यात आल्याची घटना शनिवारी घडली. याप्रकरणी मोबाइलच्या दुकानाचा चालक आणि त्याचा एक साथीदार यांच्याविरोधात नया नगर पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

मिरा रोड रेल्वे स्थानक ते लल्लन तिवारी कॉलेज मार्गावरील परिवहन बस शनिवारी दुपारी मिरा रोड रेल्वे स्थानक येथील बस स्टॉपजवळ उभी करत असताना, येथील रस्त्यालगत उभी केलेली खासगी चारचाकी अडथळा ठरत होती. त्यामुळे ती हलवण्याची विनंती बसचे वाहक विष्णू माळी यांनी केली. त्यावर, वाहनमालकाने अरेरावी करत, वाहन हलवणार नाही अशी भूमिका घेत वाद घालण्यास सुरुवात केली. त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न इतर काही परिवहन कर्मचाऱ्यांनी प्रयत्न



केला. मात्र, वाहनमालकाने व त्याचा एका साथीदाराने आक्रमक होत, त्यांना शिवीगाळ तसेच मारहाण केली.

या गोंधळात तिकिटांचे दहा हजार रुपयेदेखील गहाळ झाले. या घटनेची तक्रार बसचालक हनुमंत उगलमोगले यांनी जवळच्या नयानगर पोलिस ठाण्यात केली. त्यानंतर खाजगी वाहन मालक अनिल छेडा व त्याचा सहकारी बनारसी मिश्रा या दोघांविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करून त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. छेडा हा मोबाइल दुकानाचा मालक आहे.

CamScanner

पुढारी ५-५ी.२०

# राज्यातील ३५४ पोलीस निरीक्षक होणार एसीपी

## पोलीस महासंचालक कार्यालयात ९ ते २१ फेब्रुवारी दरम्यान हजर राहण्याचे प्रशासनाचे आदेश

**नवी मुंबई : राजेंद्र पाटील**

राज्य पोलीस दलात नोव्हेंबर २०२२ पासून गृहखात्याने पदोन्नती प्रक्रिया वेगाने सुरू केली आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाने २०२२-२३ मध्ये ३५४ पोलीस निरीक्षकांची पदोन्नतीसाठी निवडसूची तयार केली आहे. या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांसाठी एक कालबध्द कार्यक्रम ९ ते २१ फेब्रुवारीदरम्यान घेण्यात आला आहे. निवडसूचीतील अधिकाऱ्यांना पोलीस महासंचालक कार्यालयात दिलेल्या तारखांना हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

या अधिकाऱ्यांकडून तीन पसंतीची ठिकाणे घटकप्रमुखांमार्फत पाठवली जाणार आहेत. निवडसूचीतील अधिकाऱ्यांविरुध्द सुरू असलेली विभागीय चौकशी तातडीने पूर्ण करून घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शिवाय कारणे दाखवा नोटीस अथवा कसुरी अहवाल प्रलंबित असल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचेही घटकप्रमुखांना सांगण्यात आले. या अधिकाऱ्यांचे सेवापुस्तक पडताळून शिक्षांची अंमलबजावणी पूर्ण झाली आहे की नाही ते तपासून अहवाल पाठवण्याचे निर्देश अपर पोलीस महासंचालक संजीवकुमार सिंघल यांनी ३० जानेवारी रोजी दिले आहेत. या पदोन्नतीमुळे सहाय्यक पोलीस निरीक्षकांचा पोलीस निरीक्षक पदोन्नतीचा मार्ग मोकळा होणार आहे.

पोलीस महासंचालक कार्यालयाने ऑक्टोबर २०२२ पासून १९ पोलीस निरीक्षकांना सहाय्यक पोलीस आयुक्तपदावर बढती दिली. त्यानंतर २०२१-२२ या वर्षीची निवडसूची तयार केली. त्यामध्ये सहा महसूल विभागांसह मुंबई, ठाणे, ठाणे ग्रामीण, नवी मुंबई आणि मिरा-भाईंदर येथील पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या १७५ पोलीस निरीक्षकांची यादी जाहीर केली. नोव्हेंबरअखेर महासंचालक कार्यालयाने घटकप्रमुखांकडून मागवलेल्या माहितीत सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस उपअधीक्षक दर्जाची २६४ पदे रिक्त असल्याची माहिती दिली होती. त्यानंतर मेअखेरपर्यंत आणखी काही अधिकारी सेवानिवृत्त होणार असल्याने मोठ्या प्रमाणावर स. पोलीस आयुक्त पदे रिक्त होणार आहेत.



### यामुळे जातात पोलीस अधिकारी मॅटकडे

- पोलीस महासंचालक कार्यालयाकडून पदोन्नतीची निवड सूची तयार केली जाते. निवड सूचीतील अधिकाऱ्यांची माहिती पाठविताना काही घटक प्रमुख (एसपी, सीपी, आयजी, स्पेशल आयजी) अपुरी माहिती पाठवणे, उशिराने पाठवणे, कधीतर पाठवतच नाहीत असे प्रकार करतात.
- अशा अधिकाऱ्यांना पदोन्नती देताना प्रशासकीय अडचणी निर्माण होतात. त्यामुळे बऱ्याचशा अधिकाऱ्यांची प्रकरणे खुली ठेवावी लागतात. निवड सूचीवर पदोन्नती न मिळाल्यामुळे ते अधिकारी मॅटमध्ये दावे दाखल करतात. त्यामुळे मॅटच्या निर्णयानुसार पदोन्नतीचे आदेश देण्याची वेळ आली आहे.

### पदोन्नतीतील अधिकाऱ्यांची यादी

- मुंबईतील९०, ठाणे २६, नवी मुंबई १८, मिर-भाईंदर ९, पालघर ४, पुणे, पिंपरी-चिंचवड, ग्रामीण २०, नाशिक शहर, ग्रामीण १३, कोल्हापूर ५ अशी आकडेवारी पोलीस प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आली.

पुढारी पा.नं.४.

# हिंदूंचे पूर्वजही मुस्लिमच होते

## मौलाना अर्शद मदनींचे वादग्रस्त वक्तव्य; हिंदू धर्मगुरू संतप्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इस्लाम हाच सर्वात जुना धर्म आहे. हिंदूंचे पूर्वजही मुस्लिमच होते. पहिले प्रेषित आदम-अलै-सलाम हे भारतीय उपखंडातच दाखल झाले होते. थोडक्यात पृथ्वीवर पहिला मनुष्य अवतरला तेव्हापासून इस्लामचे अस्तित्व आहे. आदमलाच इथे मनू म्हटले जाते. मनू हा अल्लाहचीच उपासना करत होता, असे विधान दिल्लीतील राम लीला मैदानावर आयोजित जमियत-ए-उलेमा-ए-हिंदच्या कार्यक्रमात रविवारी मौलाना अर्शद मदनी यांनी केले आणि एकच वाद झाला.

मदनींच्या या विधानावर हिंदू धर्मगुरूंनी आक्षेप नोंदवला आणि व्यासपीठ सोडले. सरसंघचालक मोहन भागवत यांनी, हिंदू व मुस्लिमांचे पूर्वज एकच असल्याचे विधान केले होते. भागवत यांच्या विधानाचा रोख भारतीय मुस्लिमांचे पूर्वज हे हिंदूच होते, असा होता. त्याविरुद्ध मदनी यांनी वरीलप्रमाणे भाष्य केले.



- **कुणीही मोहम्मद पैगंबराचा अपमान करता कामा नये.**
- **मोहम्मद पैगंबरांचा अपमान मुस्लिम सहन करणार नाही.**
- **शिक्षणाचे भगवेकरण सुरू आहे. ते मान्य नाही.**

### जैन धर्मगुरूंचा मदनींना आक्षेप

- मौलाना मदनी यांच्या वक्तव्यावर जैन मुनी लोकेश यांनी तीव्र हरकत नोंदवली. ते म्हणाले की, हे अधिवेशन जर माणसे जोडण्यासाठी आयोजिलेले असेल तर मदनींच्या विधानाला काय औचित्य आहे?
- अल्लाहने मनुष्याची जात निर्माण केली, यावरच आमचा विश्वास नाही. आम्ही जैन तर तिर्थकरांनी आम्हाला जन्माला घातले, असेही मानत नाही. देवाने नव्हे तर आई-वडिलांनी आम्हाला जन्म दिला, हे वास्तव आम्ही मानतो.
- सर्व पंथ समान आहेत, असा संदेश अशा आयोजनांतून अपेक्षित होता. आम्हीच खरे, बाकी खोटे, याला काही अर्थ नाही, असेही मुनी लोकश यांनी स्पष्ट केले. त्यांनी कार्यक्रम स्थळ सोडले. त्यांच्यानंतर संतांनी काढता पाय घेतला.

मौलाना मदनी म्हणाले, ना श्रीराम होते, ना ब्रह्मा होते, ना शिव होते... मग तेव्हा मनूने कुणाची पूजा बांधली? मनू हा अल्लाहचीच पूजा करत होता. आदमच्या मुलांना आपण जसे आदमी म्हणतो, तसेच मनूच्या मुलांना मनुष्य म्हणतो. त्यामुळे अल्लाह हाच खरा देव आहे.

मौलाना अर्शद मदनी हे जमियत प्रमुख मेहमूद मदनी यांचे काका आहेत. भारत हा देश जितका मोदींचा तितकाच मदनींचाही आहे, असे मेहमूद मदनी याच व्यासपीठावरून या आधी म्हणाले होते. मात्र, मदानी यांच्या वक्तव्यावरुन नाराजी पसरली आहे.

असणारा हा समाज आज याठिकाणी भव्यदिव्य अशा प्रमाणात उपस्थित आहे. त्यामुळे मी आपल्या सर्वांना शुभेच्छा देतो.

बंजारा समाज भवन देखील या नवी मुंबईत तुम्हाला मोठं भवन मिळणार आहे. वसंतराव नाईक संशोधन प्रशिक्षण केंद्र हे स्थापन करण्यासाठी मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांना १०० कोटी दिले होते. अडीच वर्षात तुम्हाला पैसे मिळाले होते का?. आपल्या सरकारने बंजारा समाजाला ५९३ कोटी रुपये देण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. आम्ही तुम्हाला आमचा एक समाज मानतो. तुमच्या कुटुंबातील मी एक सदस्य आहे. आम्ही आपल्या समाजाच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहोत, असं शिंदे म्हणाले.

# वसई, भाईंदरसाठी पोलीस भरती प्रक्रिया सुरू

वसई : मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस भरती प्रक्रिया शुक्रवारपासून सुरू झाली. पहिल्याच दिवशी महिलांची मैदानी चाचणी घेण्यात आली. महिला पोलिसांच्या २९४ जागांसाठी ११ हजार ७८७ अर्ज आले असून महिला आणि पुरूषांच्या एकूण ९९६ जागांसाठी ७४ हजार ४५८ उमेदवारांचे अर्ज आले आहेत. २८ फेब्रुवारीपर्यंत ही मैदानी चाचणी होणार आहे. सध्या शिपाई पदाच्या ९८६ तर शिपाई वाहन चालक पदाच्या दहा अशा एकूण ९९६ पदांसाठी भरती सुरू आहे. पोलीस आयुक्त मधुकर पांडेय, अतिरिक्त पोलीस आयुक्त श्रीकांत पाठक यांच्या मार्गदर्शनाखाली शेकडो अधिकारी-अंमलदारांच्या बंदोबस्तात भरती प्रक्रिया सुरू आहे. महिलांच्या २९४ जागांसाठी ११ हजार ७८७ अर्ज आले आहेत. यामध्ये ३ महिलांसाठी चालक म्हणून जागा उपलब्ध आहे.



# त्यामुळे वाहनचालक, प्रवाशांचे हाल;

लोकमत

# गाडी ८ वर्षे जुनी आहे? तर 'ही' टेस्ट बंधनकारक

## पर्यावरणाच्या दृष्टीने केंद्र सरकार लागू करणार नियम

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा** : सुरक्षा आणि पर्यावरणाला आणखी चांगले करण्यासाठी केंद्र सरकार दि. १ एप्रिल २०२३ पासून एक नवीन नियम लागू करणार आहे. या अंतर्गत आठ वर्ष जुन्या कमर्शियल वाहनांची दरवर्षी फिटनेट टेस्ट करणे बंधनकारक असणार आहे. रस्ते परिवहन आणि राजमार्ग मंत्रालयाने दि. २ फेब्रुवारी रोजी ड्राफ्ट नोटिफिकेशन जारी करताना याविषयी काही हरकती आणि सूचना असल्यास त्या मागविल्या आहेत. या दिलेल्या माहितीनुसार, ८ वर्षे जुन्या ट्रक किंवा बसला दर दोन वर्षांत एकदा फिटनेस टेस्ट करावी लागणार आहे, तर आठ वर्ष जुन्या कमर्शियल वाहनांना दरवर्षी फिटनेस टेस्ट करणे बंधनकारक असणार आहे. ही फिटनेस टेस्ट फक्त लिस्टेड ऑटोमेटेड फिटनेस स्टेशनवर करणे गरजेचे आहे.




### ट्रक-बससह व्यावसायिक वाहनांना टेस्ट बंधनकारक

**१ ट्रक-बसला दरवर्षी :** यामध्ये आठ वर्षांखालील ट्रक किंवा बस इत्यादींना वर्षातून एकदा फिटनेस चाचणी करावी लागेल.

**२ व्यावसायिक वाहनांना दरवर्षी :** व्यावसायिक वाहनांना दरवर्षी फिटनेस सर्टिफिकेट घेणे बंधनकारक असेल. फिटनेस तपासणीसाठी स्वयंचलित यंत्राचा वापर करण्यास प्राधान्य दिले आहे. उशीर झाल्यास लागणार विलंब शुल्कवाहनांच्या नोंदणीच्या वेळेत नूतनीकरण करणे बंधनकारक आहे.

### कोठे कराल फिटनेस टेस्ट?



प्रदूषण कमी करण्यासाठी सरकारकडून वेगवेगळ्या स्तरावर प्रयत्न केले जात आहेत. याच अनुषंगाने आता सरकारकडून आणखी एक नियम लागू करण्यात येत आहे. या नियमानुसार आता सर्व वाहनधारकांना ऑटोमेटेड टेस्टिंग स्टेशनमधूनच वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट घ्यावे लागणार आहे. म्हणजेच, आता इतर कोणत्याही ठिकाणाहून घेतलेले वाहनाचे फिटनेस सर्टिफिकेट वैध राहणार नाही.



CamScanner

लोकमत

# बांगलादेशी नागरिकाला अटक

नालासोपारा : विरार येथे एका बांगलादेशी नागरिकाला विरार पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. मनवेलपाडा, लकी बारसमोर गेल्या दहा ते बारा वर्षापासून भारतात राहण्यासाठी कोणतेही वैद्य प्रमाणपत्र जवळ नसताना एक बांगलादेशी नागरिक राहत असल्याची माहिती विरार पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार शनिवारी सोईल मॉडल (३२) या बांगलादेशी नागरिकाला ताब्यात घेऊन त्याच्याविरोधात विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

Mumbai Main
Page No. 5 Feb 13, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

लोकमत

# दुचाकी चोराला अटक; दोन गुन्ह्यांची केली उकल

## माणिकपूर गुन्हे शाखेची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांना दहिसर येथून दुचाकी चोरणाऱ्या आरोपीला पकडण्यात यश मिळाले आहे. पोलिसांनी दोन गुन्ह्यांची उकल करून चोरीच्या पाच दुचाकी हस्तगत केल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी विशाल धायगुडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

नायगावच्या उमेळे येथे गार्नेट अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या निहाल घरत (३१) यांनी नायगाव पश्चिम रेल्वे ब्रिजच्या बाजूला मंगळवारी सकाळी दहाच्या सुमारास पार्क करून ठेवलेली ९० हजार रुपये किमतीची इलेक्ट्रिक दुचाकी चोरट्यांनी चोरी करून पळवून नेली होती. माणिकपूर पोलिसांनी वाहनचोरीचा गुन्हा दाखल केला होता. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे माणिकपूर गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन सानप व पोलिस अंमलदार यांनी तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त बातमीदारामार्फत आरोपी चंद्रेश गणेशप्रसाद पाठक (२३) याची माहिती मिळवली. त्यानंतर दहिसर येथे पोलिसांनी सापळा रचून कारवाई करीत आरोपी चंद्रेश पाठक याला ताब्यात घेतले.

ही कामगिरी पोलिस उपायुक्त सुहास बावचे, सहायक पोलिस आयुक्त पद्मजा बडे यांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपूरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संपतराव पाटील, गुन्हे प्रकटीकरणचे सहायक पोलिस निरीक्षक सचिन सानप, सचिन शिंदे, पोलिस उपनिरीक्षक तडवी, तुकाराम भोपळे, पोलिस हवालदार चौधरी, पाटील, चंदनशिवे, चव्हाण, कानडे यांनी केली आहे.

### सापळा रचून जेरबंद

आरोपी चंद्रेश गणेशप्रसाद पाठक (२३) याला दहिसर येथे सापळा कारवाई करून ताब्यात घेतले. त्याने दुचाकी चोरीचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यावर त्याला अटक केली आहे. अटक आरोपीकडून दुचाकी चोरल्याचे सांगितले. आरोपीकडून ३ लाख १० हजार रुपये किमतीच्या ५ दुचाकी हस्तगत केल्या आहेत. माणिकपूर पोलिस ठाण्यातील दोन गुन्हे उघड करण्यात यश आले आहे.



CS CamScanner

लोकमत



दुचाकी चोरणाऱ्या आरोपीला पकडण्यात यशस्वी ठरलेले माणिकपूरच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी.

Hello Vasai
Page No. 1 Feb 13, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner